MANAGING COMMITTEE
2014 - 2015

PRESIDENT
Vimal Shah

IMMEDIATE PAST PRESIDENT
Paras Gundecha

PRESIDENT-ELECT
Dharmesh Jain

VICE PRESIDENTS
Mayur Shah
Nayan Shah
Deepak Goradia
Boman R. Irani

HON. SECRETARY
Nainesh Shah

HON. TREASURER
Sukhraj Nahar

CEO
S. Shahzad Hussain
I.A.S. (Retd.)

HON. JOINT SECRETARIES
Harish Patel
Ashok Mohanani
Sandeep Runwal
Bandish Ajmera

JOINT TREASURERS
Lakshman Bhagtani
Mukesh Patel

CO-ORDINATORS
Rasesh Kanakia
Jagdish Ahuja
Pujit Aggarwal
Parag Munot

COMMITTEE MEMBERS
Jayesh Shah
Nayan Bheda
Sanjay Chhabria
Rajendra Chaturvedi
Shailesh Sanghvi
Tejas Vyas
Jitendra Jain

INVITEE MEMBERS
Sandeep Raheja
Munish Doshi
Domnic Romell

PAST PRESIDENTS
Sunil Mantri
Pravin Doshi
Mohan Deshmukh
Mofatraj Munot
Niranjan Hiranandani
Rajni S. Ajmera
G. L. Raheja
Lalit Gandhi
Babubhai Majethia

MCHI-CREDAI UNITS

President, Thane
Suraj Parmar

President, Kalyan-Dombivli
Johar Zojwalla

President, Mira Virar City
Ashit Shah

President, Raigad
Vikas Bhamre

President, Navi Mumbai
Arvind Goel

O/C

MCHI - CREDAI

Ref. No. MCHI/PRES/14-15/124

January 16, 2015

प्रति,

**मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

महोदय,

आमच्या संघटनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील बांधकाम क्षेत्रातील मंदीचे सावट लक्षात घेऊन राज्यातील रेडी रेकनर दर - Ready Recknor Rate (सिद्ध शीघ्र प्रगणक) स्थिर ठेवावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे माननीय महसुल मंत्री श्री एकनाथ खडसे यांच्याकडे केलेली होती. परंतु रेडी रेकनरच्या अवास्तव दरामुळे मुंबई महानगर परिक्षेत्र व लगतच्या परिसरात अनेक व्यवहार मंदावले आहेत. राज्यात रेडी रेकनरच्या अवास्तव दराबाबत अनेक तक्रारी असून, घर अथवा जमिन खरेदी विक्रीचे व्यवहारही त्यामुळे रखडले आहेत.

त्या पार्श्वभूमीवर जानेवारी २०१५ पासून राज्यभरातील वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्याची (ASR) फेररचना करण्यात आलेली आहे. राज्यात रेडी रेकनरच्या दरामध्ये सरासरी १४ ते ४० टक्क्यांनी वाढ करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे घरे व जमिनीच्या नोंदणी शुल्कामध्येही वाढ होऊन त्याचा फटका सर्वसामान्यांनाच बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

रेडी रेकनरच्या दरात मुंबईत सरासरी ४० टक्यांनी वाढ करण्यात आली असून ठाण्यात आणि पुण्यात २५ ते ३० टक्यांपर्यंत वाढ झाली आहे. ज्या भागात घरांचे दर जास्त आहेत, तसेच ज्या भागात घरांची संख्या वाढत आहे, त्या भागातील रेडी रेकनरच्या दरात सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे. मोठ्या रस्त्यांना लागून असलेल्या भागातील घरांच्या रेडी रेकनर दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. अशाच प्रकारे मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील मोक्याच्या परिसराचे रेडी रेकनरचे दर वाढविण्यात आले आहेत. यावेळी सुमारे ४ हजार चौरस फुटापेक्षा अधिक बांधकाम असलेल्या तसेच जलतरण तलाव, क्लब हाऊस, व्यायामशाळा, जॉगिंग ट्रॅक अशा सुविधा असणाऱ्या गृह संकुलांसाठी वेगळे रेडी रेकनर दर ठेवण्यात आले आहेत. ही वाढ ६० टक्यांपर्यंत आहे.

तरी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यास खेद होतो की, या रेडी रेकनरच्या वाढीला आमच्या संघटनेचा प्रखर विरोध आहे. यास्तव मुंबईमध्ये विशेषत्वाने घरांच्या किमती व्यावसायिक जागांच्या किमतीपेक्षा खूप कमी आहेत. याचा परिणाम म्हणून या परिसरात

लिपिक १६/१/१५
मुख्यमंत्री सचिवालय
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

लिपिक
मंत्री, महसूल, मदत कार्य व पुनर्वसन
भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि वक्फ
... पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि ... यांचे कार्यालय
... शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

MCHI-CREDAI (ISO 9001:2008)
Maker Bhavan II, 4th Floor, 18, Sir Vithaldas Thackersey Marg, New Marine Lines, Mumbai - 400 020.
Tel.: 4212 1421, Fax : 4212 1411 / 407 • Email: secretariat@mchi.net
Website : www.mchi.net

हक्काचे घर घेऊ इच्छिणाऱ्यांवर वाढीव मुद्रांक शुल्काचा बोजा पडला आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या अटी व शर्तीनुसार बांधकाम व्यावसायिक निवासी घरांकरिता असलेले दर प्रचलित रेडी रेकनरच्या दरांपेक्षा कमी करू शकत नाहीत. परिणामी घरांच्या किमती भरमसाठ वाढत असून शासनची "सर्वांसाठी परवडणारी घरे" ही योजना बाधित होत आहे. सदरची भाववाढ अवास्तव व अमान्य असून, शासनाने रेडी रेकनरचे दर तात्काळ रद्द करावेत व २०१४ चे रेडी रेकनरचे दर अमलात आणावेत, ज्याचा सर्वसामान्य नागरिकाला घर खरेदी अथवा इतर व्यवहारांमध्ये जास्तीतजास्त फायदा होईल.

आपण सर्वंकष बाबींचा विचार करून याबाबत योग्य तो विकासात्मक निर्णय घ्यावा अशी मी आग्रही विनंती करीत आहे.

माझ्या सदर निवेदनाचा आपण प्राथम्याने व गांभीर्याने विचार करावा ही नम्र विनंती

आपला विश्वासू
**एम सी एच आय - क्रेडाई करिता**

**विमल शहा**
अध्यक्ष

प्रत माहितीकरिता सविनय सादर

**मा. ना. श्री. एकनाथ खडसे**
महसुल मंत्री
महाराष्ट्र शासन
मुंबई

Received Stamp
1st Page

**श्री. के एच गोविंदराज (भा.प्र.से.)**
सचिव ( मदत व पुनर्वसन )
महसूल व वने विभाग
महाराष्ट्र शासन
मुंबई

१४ मजला, नवीन प्रशासन भवन
मंत्रालयासमोर

लिपिक
सचिव (म.व पु.) यांचे कार्यालय,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

**डॉ. श्रीकर परदेशी (भा.प्र.से.)**
मुद्रांक व दस्तनोंदणी महानिरीक्षक
महाराष्ट्र शासन
पुणे

Old Customs House
Ms. Bhosale Madam PA to Shri Manik Gursal Sir